**निवेदन**
आपल्या प्रभागातील समस्या, दैनंदिन अडचणी, फसवणूक, अन्याय-अत्याचार, मुजोरी तसेच आपल्या मनातील सूचना, शंका, उपाय यासाठी सा. संघर्षाचा आवाज आपणास खास व्यासपीठ मिळवून देत आहे.
करा त्वरा, होऊ द्या मनातला निचरा!
संपर्क : ७२७६८७१००८

साप्ताहिक

# संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013
■ https://sangharshachaaawaz.in

■ वर्ष : १४ वे ■ अंक : ०६ वा ■ सोमवार दि.३१ ऑगस्ट ते ०६ सप्टेंबर २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने - ०४

शहरातील ध्वनिप्रदूषण नियंत्रणात... पान २ वर | ...अन्यथा SC, ST समूह सामाजिक... पान ३ वर | योगाला शिक्षण, रोजगार आणि... पान ४ वर

## कंत्राटी कामगारांना चांगल्या दर्जाचा उपचार मिळावा म्हणून कामगार हितरक्षक संघ महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आंदोलन




**पुणे :** कामगार हितरक्षक संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने ईएसआयसी हॉस्पिटल, बिबवेवाडी येथे उपचारासाठी येणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना भेडसावणाऱ्या विविध अडचणींबाबत प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ईएसआयसी हॉस्पिटल, बिबवेवाडीच्या मुख्य गेटसमोर लोकशाही मार्गाने दि.३१/८/२०२६ रोजी आंदोलन करण्यात येणार आहे.

सदर हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी येणाऱ्या अनेक रूग्णांना योग्य व वेळेवर उपचार मिळत नसल्याच्या तक्रारी संघटनेकडे प्राप्त होत आहेत. तसेच डॉक्टर व संबंधित स्टाफकडून रूग्णांना योग्य मार्गदर्शन व सहकार्य मिळत नसल्याच्या तक्रारी असून, अनेक रूग्णांना वारंवार ससून हॉस्पिटल येथे पाठविले जात असल्याचे निदर्शनास येत आहे. या गंभीर बाबींची दखल घेऊन कामगार हितरक्षक संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनामध्ये ईएसआयसी अंतर्गत सध्याची वेतन मर्यादा २१,०००/- वरून ३५,०००/- करण्यात यावी. यासाठी ईएसआयसी प्रशासनाने केंद्र शासनाकडे तातडीने प्रस्ताव पाठवावा, ईएसआयसी हॉस्पिटल बिबवेवाडीचे डीन श्री.गायकवाड साहेब यांची तात्काळ बदली करण्यात यावी व हॉस्पिटल प्रशासनात सक्षम व रूग्णाभिमुख अधिकारी नियुक्त करण्यात यावा, ईएसआयसी रूग्णांना अनावश्यकपणे ससून हॉस्पिटल येथे रेफर करण्याची पद्धत तात्काळ थांबवावी. ईएसआयसी च्या नियमानुसार व उपलब्ध सुविधांनुसार आवश्यक असल्यास अधिकृत टाय-अप/Empanelled हॉस्पिटमध्येच रूग्णांना रेफर करण्यात यावे, ज्या उपचारांची सुविधा ईएसआयसी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध नाही, अशा रूग्णांना अनावश्यक विलंब न करता तात्काळ योग्य (पान ३ वर)

## समाविष्ट गावांतील करवाढीवरून गटनेते काकासाहेब चव्हाण आक्रमक; महापालिकेत सर्व विरोधी पक्षांच्या सभासदांची निदर्शने

**पुणे :** समाविष्ट गावांतील नागरिकांवर लादण्यात आलेल्या करवाढीचा प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे गटनेते काकासाहेब चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली नुकतेच पुणे महापालिका सभागृहात सर्व विरोधी पक्षांच्या वतीने जोरदार निदर्शने करण्यात आली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नावर प्रशासन आणि सत्ताधारी केवळ आश्वासने देत असून प्रत्यक्ष निर्णय घेण्यास मात्र टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

राज्यात आणि महापालिकेत महायुती सरकार सत्तेत असताना समाविष्ट



गावांच्या करप्रश्नावर निर्णय घेण्यास एवढा विलंब का होत आहे? नागरिकांकडून करवसुली करण्यासाठी प्रशासनाची घाई असते, मग त्यांना दिलासा देणारा निर्णय घेण्यासाठी एवढी दिरंगाई का? असा थेट सवाल काकासाहेब चव्हाण यांनी उपस्थित केला.

गत १६ मार्च रोजी महापौरांसोबत झालेल्या बैठकीत समाविष्ट गावांतील सर्व सभासदांना विश्वासात घेऊन करप्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सर्वपक्षीय समिती (पान ४ वर)

## समाविष्ट गावांतील कर आकारणीचे विशेष ऑडिट करा - अध्यक्ष स्थायी समिती, श्रीनाथ भिमाले

**पुणे :** पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये १ एप्रिल २०२५ ते १ ऑगस्ट २०२६ या कालावधीत झालेल्या अधिकृत तसेच अनधिकृत बांधकामांच्या कर आकारणीचे विशेष लेखापरीक्षण (ऑडिट) करण्याचा ठराव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला होता. या प्रस्तावाला मान्यता दिल्याचे समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले.

कर आकारणीतील त्रुटी आणि त्यातून झालेल्या संभाव्य महसूल गळतीची मिळकतनिहाय चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी प्रस्तावात करण्यात आली आहे. नगरसेविका रत्नमाला संदीप सातव यांनी



हा ठराव सूचविला होता.

समाविष्ट गावांमध्ये कमी क्षेत्रफळावर किंवा चुकीच्या वापरानुसार कर आकारणी झाली आहे का, कर आकारणी न झालेली बांधकामे किती आहेत तसेच अनधिकृत बांधकामांमुळे महापालिकेच्या महसुलाचे किती नुकसान झाले, याची पडताळणी ऑडिटमध्ये करण्यात यावी, असे ठरावात नमूद आहे. मिळकत क्रमांक, मंजूर व प्रत्यक्ष (पान ३ वर)

## ISRO आणि DRDO च्या खाजगीकरणावरून ॲड.प्रकाश आंबेडकरांचा मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल; देश विकून व्याज भरणार का?

**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर अतिशय कडक शब्दात हल्लाबोल केला आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) आणि संरक्षण संशोधन व विकास संस्था (DRDO) यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि संवेदनशील राष्ट्रीय संस्थांमध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्याच्या सरकारच्या धोरणावर त्यांनी जोरदार आक्षेप घेतला आहे.




ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर निशाणा साधताना म्हटले आहे की, स्वतः अमेरिकेच्या तालावर नाचत आहात आणि गुजराती उद्योगपतींच्या दावणीला बांधले गेले आहात. पण, किमान ISRO आणि DRDO या राष्ट्रीय संस्थांना तरी सोडून द्या!

ॲड. आंबेडकर यांनी पुढे म्हटले आहे की, निवडणुका जिंकण्यासाठी कंपन्यांकडून कोट्यवधींचा निधी आणि देणग्या घेतल्या, आणि आता देश विकून त्याचे व्याज भरणार आहात का?

DRDO ची क्षेपणास्त्र निर्मिती तंत्रज्ञान (Technology Transfer) खाजगी संरक्षण कंपन्यांना देण्याचा निर्णय आणि ISRO द्वारे रॉकेट निर्मितीचे काम टप्प्याटप्प्याने खाजगी क्षेत्राकडे सोपवून संशोधन आणि नव्या स्पेस तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करण्याचे वृत्त समोर आले आहे. या निर्णयावरूनच प्रकाश आंबेडकरांनी सरकारवर देश विकल्याचा गंभीर टीका केली आहे.

संरक्षण आणि अंतराळ तंत्रज्ञानातील खाजगी सहभागामुळे देशाच्या सुरक्षेवर आणि स्वावलंबनावर परिणाम होऊ शकतो, असा इशारा देत वंचित बहुजन आघाडीने या धोरणाचा तीव्र निषेध केला आहे.

# संपादकीय...

## शहरातील ध्वनिप्रदूषण नियंत्रणात येणार का?

शहरातील ध्वनिप्रदूषण नियंत्रित करण्यांसदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी केली नसल्याचा आरोप करत पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्यात आली आहे. ही याचिका गुरूवारी (दि.२७) दाखल केल्याची माहिती याचिकाकर्त्यांचे वकील अ‍ॅड.सत्या मुळे यांनी दिली.

ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर १८८ अंतर्गत कारवाई करण्यात आली असून, साउंड सिस्टिम सीझ करण्यात आली आहे. त्याचबरोबर हजारच्यावर रीडिंग घेऊन १४८ प्रकरणांत ध्वनिप्रदूषणाच्या नियमांच्या अनुषंगाने कारवाई केली आहे. नियमांचे काही उल्लंघन होणार नाही आणि लोक स्वतःहून नियमांचे पालन करतील, या दृष्टिकोनातून प्रयत्न सुरू आहेत आणि जे पालन करणार नाहीत, त्यांच्याबद्दल कडक कारवाई करण्याची भूमिका पोलिसांची आहे. असे पुणे पोलिस आयुक्त, अमितेश कुमार यांनी सांगितले.

अखिल भारतीय ग्राहक पंचायक, भारतीय मजदूर संघ, पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था व अपार्टमेंट महासंघ, पुणे जिल्हा रिटेल व्यापारी संघ, पुणे, श्री.स्वामी समर्थ सहकारी संस्था, पुणे आणि ८१ वर्षीय ज्येष्ठ नागरिक विलास लेले यांनी ही याचिका दाखल केली आहे.

याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, मुंबई उच्च न्यायालयाने २० ऑगस्ट २०२४ रोजी ध्वनिप्रदूषण नियंत्रित करण्यासाठी निर्देश दिले होते. मात्र, पुणे पोलिसांकडून या निर्देशांचे पालन करण्यात कसूर झाल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

गणेशोत्सव, धार्मिक सण, राजकीय कार्यक्रम, मिरवणुका आणि अन्य सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये उच्च क्षमतेच्या डीजे यंत्रणा, अ‍ॅम्प्लिफायर आणि लेझर बीमचा वापर केला जात असल्याचे याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे. तीव्र आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, रूग्ण, विद्यार्थी, दुकानदार आणि कामगारांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

कोणताही धर्म कायद्याचे उल्लंघन करण्याची परवानगी देत नाही. ही याचिका कोणत्याही धर्माच्या किंवा उत्सवाच्या विरोधात नसून सर्व प्रकारच्या ध्वनिप्रदूषणाविरोधात आहे. असे अ‍ॅड.सत्या मुळे यांनी स्पष्ट केले. पारंपारिक वाद्ये आणि संगीताचा कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादेत वापर करण्यास याचिकाकर्त्यांचा विरोध नसल्याचेही त्यांनी सांगितले. याचिकेत पुण्यातील बार, पब, क्लब, रूफटॉप बार आणि रेस्टॉरंटमधून होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाचाही मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. कल्याणीनगर, कोरेगाव पार्क, बालेवाडी, बाणेर आणि विमाननगरसारख्या निवासी भागांतील नागरिकांना रात्रीच्या आवाजाचा त्रास सहन करावा लागत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

ध्वनिप्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० नुसार औद्योगिक क्षेत्रात दिवसा ७५ व रात्री ७० डेसिबल, व्यापारी क्षेत्रात ६५ व ५५, निवासी क्षेत्रात ५५ व ४५, तर शांतता क्षेत्रात ५० व ४० डेसिबलची मर्यादा आहे. रूग्णालये, शैक्षणिक संस्था आणि न्यायालयांच्या सभोवतालचा १०० मीटरपर्यंतचा परिसर शांतता क्षेत्र मानला जातो. ध्वनिपातळीच्या आकडेवारीनुसार, २०२५ मध्ये जेधे चौकात दिवसा १०५ डेसिबल, टिळक चौकात ९३.८ संत कबीर चौकात ९०.२ आणि सोन्या मारूती चौकात ९०.२ डेसिबल आवाज नोंदविण्यात आला.

ध्वनिप्रदूषणाबाबत नागरिकांनी पोलिसांच्या ११२ क्रमांकावर तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे. राजकीय दबावामुळे नियमांची परिणामकारक अंमलबजावणी होत नसल्याचाही दावा करण्यात आला आहे.

यामुळे येणाऱ्या गणेशउत्सवामध्ये डीजे लावण्यासंदर्भात पुणे शहरात दोन गट निर्माण झाले आहेत. यावर सत्ताधारी आणि पोलिस विभाग काय मार्ग काढतात. याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.


साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक – यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग – सी – २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे – ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात
Email : sangharshachaaawaz22@gmail.com
Email : sangharshachaaawaz@rediffmail.com
Mob. : 7276871008 / 9665487134



## सिगोलवाद सुत्त

मला उपलब्ध वाङमयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरूवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.

जयभीम!

**उत्तमराव सोनवणे**

**मागील अंकावरून**

दुसऱ्याचे नुकसान करण्याची इच्छा धरणारे, वाईट मित्र, सोबती ही सहा कारणे मनुष्याच्या सत्यानाशास कारणीभूत ठरतात.

ज्याचे मित्र व सहयोगी, सोबती जर पापानी बरबटले असतील तर तो दोन्ही जगात नष्ट–भ्रष्ट होईल. या लोकात व परलोकात देखील जुगार, परनारीगमन, दारू, नाच, गाणे, दिवसभर झोप. अनेक गल्ली बोळांत फिरणे, वाईटाची संगत, परकोटीचा लोभ अशा एकूण नऊ कारणांनी मनुष्य बरबाद होतो. नेस्तनाबूत होतो.

जो जुगार खेळतो, जो नशापाणी करतो, परस्त्रीशी अनैतिक संबंध ठेवतो. जो नीच लोकांची संगत करतो, ज्ञानी लोकांची संगत करित नाही, त्यांचा सहवास टाळतो त्याची अधोगती होते. जशी कृष्ण पक्षातील चंद्राची कला.

**क्रमश:**

## आदिवासी समाजातील मुलींनी आता शिक्षणाच्या मदतीने समाजाचे नेतृत्व करावे - मा.नितीन चंदनशिवे

**पुणे/राजूर :** आदिवासी समाज कृती समिती महाराष्ट्र, पुणे व आदिवासी स्वप्नदूत फाउंडेशन मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने राजूर येथे अकोले तालुक्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक गुणवंत मुलांचा सत्कार समारंभ अ‍ॅड. M. N देशमुख कॉलेज येथे मोठ्या उत्सवात संपन्न झाला. प्रास्ताविकात आदिवासी समाज कृती समितीचे अध्यक्ष इंजी. नामदेव गंभिरे यांनी संस्थेच्या ३५ वर्षाचा आढावा घेऊन कु जया पुंगाटी या भामरागड येथिल आदिवासी मुलीची यशोगाधा उलगडून सांगितली. त्याच प्रमाणे आदिवासी समाजाने काही ठराविक आदिवासी कार्यकर्त्यांच्या मदतीने नाशिक येथील बिरसा मुंडा मेडिकल हब, तशेच भीमाशंकर येथील पोखरी कॉलेज ची निर्मिती केली असून पुण्यामध्ये २५ गरजू व गरीब मुलांना PMY योजनेतून घरे मिळवून दिली आहेत. आदिवासीच्या शिक्षण, आरोग्य व रोजगाराच्या संधी या सरकारने कमी केल्या आहेत. तथापि आदिवासी मुलांनी जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर MPSC - UPSC या क्षेत्राकडे वळून हमखास नोकरीकडे वळावे. गैर - आदिवासी लोकानी आदिवासी समाजाच्या शिक्षण, नोकरी आणि राजकीय आरक्षण ओरबडून खाल्लं आहे. अशाही परिस्थिती मध्ये मुलांनी खचून न जात संविधानातील आदिवासी समाजाला भरभरून दिलेली कलमांचा योग्य वापर करावा. पेसा व वनहक्क कायद्यांचा अभ्यास करून गडचिरोली तील मेंढा लेखा प्रमाणे सामुदायिकदावे मंजूर करून वर्षाला एक कोटी २५ लाख च उत्पन्न केवळ बांबू व तेंदू पासून गावाला उत्पन्न मिळत असं आदर्श गाव असून शासनाने खूप पुरस्कार दिले आहेत. विशेषतः कातकरी बांधवांसाठी ६५ घरकुले मंजूर करून घेणे तशेच त्यांच्या ५१ कुटुंबासाठी जातीचे दाखले आदिवासी समाज कृती समितीच्या माध्यमातून मिळवून दिले आहेत.

स्वप्नदूत फाउंडेशन चे अध्यक्ष इंजि सुनील भांगरे यांनी स्वप्नदूत परिवाराच्या सहकार्याबद्दल सर्वच सदस्यांचे कौतुक करून. सर्वानी शिक्षणात चांगली प्रगती केली आहे. त्याच प्रमाणे महिला सदशांच्या बचतीतून पाच वर्षात सुमारे २५ लाखांचा निधी जमवला असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा नितीन चंदनशिवे यांनी त्यांच्या विनोदी शैलीत आदिवासी समाजातील रूढी आणि परंपरा सर्व समाजाला आदर्श असल्याचे नमूद करून शिकलेल्या मुलींनी आता होणाऱ्या नवऱ्याच्या घरी मुलगा बघायला जावे, व सोफ्यावर बसून मुलाच्या हातून कांदा - पोहे खायला काय हरकत आहे? मुलीचं आता समाज घडवण्याचं काम करतील असं त्यांच्या मार्कांवरून दिसून येत आहे. आदिवासींनी आता कांबळे या कवितेतील हातात तिरंगा व मांडीवर संविधान घेऊन फिरणाऱ्या कांबळे या व्यक्ती रेखेप्रमाणे संघर्ष करून आदिवासींना या गरिबीतून बाहेर काढले पाहिजे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा चिंतामणराव भुरकुंडे यांनी विद्यार्थ्यांना मेहनत , जिद्द आणि चिकाटीने शिक्षणाच्या माध्यमातून आपल्याला मिळालेल्या संधीच सोन करावं, शिक्षणासाठी कृती समितीच्या वार्षिक अहवालातील डॉ.प्रदीप आंबवणे लिखित शिक्षणाच्या वाटा हे सदर अभ्यासावे.



समाजात ज्या व्यक्ती, संघटना समाजाला सामाजिक अभिसरण प्रक्रियेत भाग घेऊन मदत करीत आहेत, त्यांच्या पाठीशी उभं राहावं त्यांचं ऋण जाणावं कृतघ्न बनू नये असे विनम्रपणे सुचविले.

या कार्यक्रमात सुमारे ११० विद्यार्थ्यांना ट्रॉफी, पुस्तक आणि रोख रकमेचं वाटप करण्यात आलं. इयत्ता १० वि मध्ये पुढील तीन मुलांनी रोख पारितोषिके पटकावली. पल्लवी बांबळे (८५.२०), रुपाली धादवड (८५२०) दीपाली धादवड (८४.६०). या ज्ञानेश्वर शाळा शिळवंडी यांनी बाजी मारली. तर शासकीय आश्रम शाळा कोहणेच्या सानिका घोडे (८४.६० ) या मुलीने तृतीय क्रमांक पटकावला. त्याचप्रमाणे इयत्ता १२ वीचे गुणवंत पहिले तीन विध्यार्थी पुढील प्रमाणे आहेत ..अक्षदा कडाळी ( ८६.५०) कीर्ती धराडे (८४.५०) भाग्यश्री धिंदळे ( ७७.५०) टक्के गुण मिळवून सर्व मुलींनी उज्वल यश संपादन करून शासकीय आश्रम शाळा पैठण चे नाव उंचावले आहे. तर आर्या गंभिरे हिने १२ वि (विज्ञान) या शाखेत (७१ .७२)टक्के गुण मिळवून स्वप्नदूत परिवारात प्रथम अली आहे.

या वेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुण्यांपैकी किसन भोजणे, दत्तात्रय पडवळे (RFO) सुदाम चपटे, खेवजी भोईर, गंगाराम सांगडे, भालेकर , दिनकर शैलकदे, खेवजी भोईर, राजेंद्र रेंगडे, किरवे, जंगले मते, भवारी, भालिंगे, इंजि विलास नवाळी, सागर गंभिरे, डॉ चंद्रकांत लहामटे, संजय गंभिरे, अशोक भवारी, नीता गोडे, संजय गोडे सांदण परिवार, राहुल राऊत - पर्यावरण प्रेमी, ऍड कोंडीराम पोपेरे, लज्ञ भांगरे, मयूर बांबळे, सचिन भांगरे, अशोक भवारी, हभप नानासाहेब गंभिरे यांचा आंब्याचं रोपटं, तुकाराम मुंढे IAS यांच्या जीवनावरील पुस्थक तुकाराम भेट देण्यात आली. शाळेतील शिक्षकांना संविधान भेट देण्यात आलं, पालकांना आंब्याचं रोपटं व बेलाचं झाडं भेट देण्यात आलं आहे. दिलीप तुपे सर यांनी छाया चित्रण केलं, कॉलेजच्या भांगरे सरांनी कार्यक्रम देखणा होम्यासाठी खूप मेहनत घेतली. गंभिरेवाडी नझ शाळेच्या चिमुकल्यानी स्वागत गीत व गोंडी गीतावर सुंदर नृत्यू करून प्रेक्षकांची मने जिंकली. यासाठी बगाड सर, कदम सरांनी खूप मेहनत घेतली. पाहुण्यांचे हस्ते व पर्यावरण प्रेमी राहुल राऊत यांचे हस्ते कॉलेज मैदानावर वृक्ष रोपण करण्यात आले. मा विकास व प्रणिता गोडे या जोडीने सुंदर सूत्रसंचालन केले. दीपक गंभिरे, उपाध्यक्ष स्वप्नदूत फाउंडेशन मुंबई यांनी आभार प्रदर्शन करून, स्नेह भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# ...अन्यथा SC, ST समूह सामाजिक न्याय, आदिवासी मंत्र्यांच्या घरावर मोर्चे काढणार – राजेंद्र पातोडे

## लाडकी बहीण योजना महाराष्ट्राचा दुहेरी आर्थिक घोटाळा!

**अकोला :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अनुसूचित जाती-जमातींच्या विकासासाठी राखीव असलेला तब्बल ४,६०१.१३ कोटींचा निधी आतापर्यंत वळविण्यात आला आहे. हा निधी तातडीने संबंधित विभागांकडे परत करण्यात यावा, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, आदिवासी मंत्री अशोक उईके, महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या डोळ्यांदेखत अनुसूचित जाती,

जमातीचा निधी लाडकी बहीण योजनेकडे वळवला जात असतांना हे मंत्री काय झक मारताय का? असा संतप्त सवाल वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे यांनी केला आहे.

नुकतेच अकोला जिल्ह्यातील सर्किट हाऊस येथे आयोजित पत्रकार परिषदेत वंचित बहुजन आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केले.




लाडकी बहीण योजनेवर CAG (कॅग) चे मुख्य आक्षेप CAG ने विधिमंडळात सादर केलेल्या राज्य आर्थिक लेखापरीक्षण अहवालात या योजनेच्या आर्थिक व्यवस्थापनावर आणि अंमलबजावणीवर गंभीर ताशेरे ओढले आहेत. कॅगचे मुख्य आक्षेप पुढीलप्रमाणे आहेत:३,५४१ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च: सरकारने या योजनेसाठी निश्चित केलेल्या बजेट तरतुदीपेक्षा तब्बल ३,५४१.१६ कोटी रुपये अधिक (Excess Spend) खर्च केले असून महिला व बाल विकास विभागाला या अतिरिक्त खर्चाचे कोणतेही ठोस आणि विशिष्ट औचित्य देता आलेले नाही.चुकीच्या बँक खात्यांमध्ये निधी पार्किंग: जानेवारी ते मार्च २०२५ या काळात काढण्यात आलेला १५,५८६ कोटी रुपयांचा निधी थेट लाभार्थींना न देता, तो 'व्हर्च्युअल पर्सनल डिपॉझिट अकाउंट्स' (VPDAs) मध्ये पार्क (साठवून) करून ठेवण्यात आला.

कॅगने याला आर्थिक शिस्तीचा अभाव आणि अनियमितता म्हटले आहे. अयोग्य लाभार्थी आणि पुरुषांना लाभ: शासकीय ऑडिट आणि माहिती अधिकारात (RTI) उघड झाले की, महिलांच्या या योजनेमध्ये सिस्टीममधील त्रुटींमुळे तब्बल १४,२९८ पुरुषांना दरमहा १,५०० रुपयांप्रमाणे सुमारे २१.४४ कोटी रुपयांचे चुकीचे वाटप झाले.

याशिवाय, लक्षावधी अपात्र महिला व एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांनाही लाभ मिळाल्याने तिजोरीचे नुकसान झाले आहे. **भांडवली विकासाला फटका:** राज्याचा निधी रस्ते, शाळा, गृहनिर्माण आणि पाणीपुरवठा यांसारख्या पायाभूत सुविधांवर (Capital Asset Formation) खर्च होण्याऐवजी केवळ लोकप्रिय कल्याणकारी योजनांकडे (Welfare Transfers) वळवला जात आहे, ज्यामुळे राज्याची आर्थिक तूट वाढत आहे.

अतिरिक्त निधी खर्च करून देखील निधी कमी असल्याचे सांगून SC ST निधी वळविला आहे. तातडीने संबंधित विभागाकडे परत करण्यात यावा अन्यथा अनुसूचित जाती, जमातीच्या ह्या फंडात कमिशनखोरी करणाऱ्या सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास मंत्र्यांच्या निवासस्थानांवर पंधरा दिवसांत मोर्चे काढण्यात येतील, असा इशाराही त्यांनी दिला.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र तरतूद केली जाते. मात्र, या समाजांच्या विकासासाठी असलेला निधी इतर योजनांकडे वळविणे हा त्यांच्या हक्कांवर अन्याय असल्याचे राजेंद्र पातोडे यांनी म्हटले आहे.

लाडकी बहीण योजना राबविण्यासाठी मागासवर्गीय समाजाच्या विकासाचा निधी वापरणे योग्य नाही. अनुसूचित जाती-जमातींच्या विकासासाठी मंजूर झालेला प्रत्येक रुपया त्याच समाजाच्या विकासासाठी खर्च झाला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

### ह्या योजने अंतर्गत सरकारने

*एप्रिल  मे २०२५ मध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्यचे ४१०.३० कोटी (एप्रिल महिन्यात हप्त्यासाठी डउ घटकांतील निधी) रुपये पळवले.

*९ सप्टेंबर २०२५ रोजी  सामाजिक न्याय व विशेष सहाय्यने ३४४.३० कोटी ऑगस्ट महिन्याच्या लाभासाठी निधी मंजूर केला.

*सप्टेंबर - ऑक्टोबर २०२५ मध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्यने ४१०.३० कोटी सप्टेंबर महिन्यातील लाडकी बहीण योजनेच्या हप्त्यासाठी मंजुर केले.

*जानेवारी -फेब्रुवारी २०२६मध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य ९८.४५ कोटी रुपये पळवले.

* मे २०२६ १० जून २०२६ मध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्यने ३४४.७४ कोटी रुपये मे महिन्याच्या हप्त्यासाठी ३,००० कोटींच्या २०२६-२७ डउ घटक तरतुदीतील निधी पळवला.

*१२ ऑगस्ट २०२६ मध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य ३४४.७४ कोटी जुलै महिन्याच्या आर्थिक लाभासाठी निधी पळवला.

कॅगने (CAG) च्या अहवालात ही राज्य सरकारच्या ह्या योजनेवर सरकारच्या चुकीचे धोरण आणि क्षमतेपेक्षा जास्त पैसे खर्च केल्यामुळे ताशेरे ओढण्यात आले आहेत. राज्य सरकारने ह्या योजनेत क्षमतेपेक्षा जास्त खर्च केलाय, याचा स्पष्ट अर्थ असा होतो की, यात मोठा भ्रष्टाचार झालाय.

या समूहांचा ४,६०१.१३ कोटींचा निधी तातडीने मूळ विभागांकडे वर्ग करावा, तसेच निधी वळविण्याच्या निर्णयाची सविस्तर माहिती सरकारने सार्वजनिक करावी, अशी मागणीही त्यांनी केली. सरकारने या मागणीची तातडीने दखल घेतली नाही, तर सामाजिक न्याय व आदिवासी विकास मंत्र्यांच्या घरावर अनुसूचित जाती, जमातीकडून या मंत्र्यांच्या घरावर तीव्र आंदोलन करण्यात येईल.

सामाजिक न्याय मंत्री, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री, राज्य आदिवासी मंत्री यांच्या समोरच अनुसूचित जाती, जमातीचा पैसा पळवला जातोय. ह्या मंत्र्यांना या पैशांतून 'कट' मिळतोय का? म्हणून हे गप्प आहेत का? असा प्रश्न निर्माण होतो.

अनुसूचित जाती-जमातींच्या विकासासाठी राखीव निधीचा वापर अन्य कारणांसाठी होऊ नये आणि या निधीचे संरक्षण करण्यासाठी सरकारने स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी मागणीही त्यांनी केली.

यावेळी वंचित बहुजन आघाडी राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य, माजी आमदार नतिकउद्दीन खतीब, अशोक सोनोने, अरुंधती शिरसाट, डॉ. धैर्यवर्धन पुंडकर यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## समाविष्ट गावांतील कर आकारणीचे विशेष...

**(पान १ वरून)** बांधकाम क्षेत्रफळ, करपात्र क्षेत्रफळ, बांधकामाचा प्रत्यक्ष वापर, कर आकारणी, फेरकर आकारणी, कर मागणी, वसुली आणि थकबाकी यांचीही तपासणी करण्याची मागणी आहे. कर आकारणी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा अधिकारीनिहाय अहवाल तयार करून त्रुटी आणि जबाबदारी निश्चित करण्याबरोबरच कर आकारणी, बांधकाम, नगररचना, क्षेत्रीय कार्यालय तसेच आवश्यकतेनुसार जीआयएस व सर्वेक्षण विभागाचे संयुक्त तपासणी पथक नियुक्त करण्याची सूचना करण्यात आली आहे. बांधकाम परवानगी, मंजूर नकाशे, प्रत्यक्ष बांधकाम आणि कर अभिलेख यांचे परस्पर पडताळणी करण्यात येणार आहे. अनियमितता, निष्काळजीपणा किंवा नियमभंग आढळल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करावी. जाणीवपूर्वक महसूल नुकसान किंवा अभिलेखात फेरफार आढळल्यास कायद्यानुसार कारवाई करून कमी आकारलेली अथवा थकीत कररक्कम वसूल करावी, अशी मागणी आहे. विशेष ऑडिटचा सविस्तर अहवाल आणि कारवाई अहवाल (एटीआर) ३० दिवसांत स्थायी समितीसमोर सादर करण्याची मागणी करण्यात आली आहे.


## पुनर्विकासासाठी विकासकांकडून प्रस्ताव आमंत्रित

अनंत अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन फायनल प्लॉट नं. ५५५/१३, तपोभूमी सोसायटी, दत्तवाडी, पर्वती, पुणे - ४११०३०

अनंत अपार्टमेंटच्या विद्यमान इमारतीच्या पुनर्विकासासाठी सक्षम, अनुभवी व आर्थिकदृष्ट्या सक्षम विकसक/बिल्डर/ठेकेदार यांच्याकडून लेखी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

निविदा शुल्क-२०,०००/- (अपरिवर्तनीय) निविदा शुल्क भरून त्याची Official Cash Receipt प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य आहे.

प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीखः ०८/०९/२०२६, सायं. ५.०० वाजेपर्यंत

प्रस्ताव उघडण्याची तारीखः ०९/०९/२०२६

माहिती व प्रकल्पासंबंधी कागदपत्रांसाठी संपर्क

नितीन देशमुख - अध्यक्ष  ९९२२९९३६३६

अभिजित बारवकर - सचिव ८६०५६५३६३६

अधिकृत संकेतस्थळ - anantapartmentpune.lovable.app“सविस्तर प्रसिद्धी पत्रक, प्रकल्पाची माहिती अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.


## कंत्राटी कामगारांना चांगल्या दर्जाचा उपचार मिळावा म्हणून कामगार हितरक्षक संघ महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आंदोलन

**(पान १ वरून)** टाय-अप/Empanelled हॉस्पिटलमध्ये रेफर करण्याची स्पष्ट व्यवस्था करण्यात यावी, गंभीर रूग्णांना वेळेत उपचार न मिळाल्यामुळे त्यांच्या जीवितास धोका निर्माण होणार नाही, यासाठी Emergency Referral System सक्षम करण्यात यावी, रूग्णांना आवश्यक औषधे, तपासण्या, बेड, डॉक्टरांची उपलब्धता व इतर वैद्यकीय सुविधा वेळेवर मिळाव्यात. औषधे किंवा सुविधा उपलब्ध नसल्याचे कारण देऊन रूग्णांना उपचारापासून वंचित ठेवू नये, रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांशी डॉक्टर, नर्सिंग स्टाफ व इतर कर्मचाऱ्यांनी सभ्य, सन्मानपूर्वक व सहकार्याच्या भावनेने वर्तन करावे. गैरवर्तनाच्या तक्रारींसाठी स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा सुरू करावी, ईएसआयसी रूग्णांना कोणत्या कारणास्तव दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये रेफर करण्यात आले, याची लेखी नोंद व रेफरलची पारदर्शक प्रक्रिया ठेवण्यात यावी, ईएसआयसी हॉस्पिटलमध्ये रूग्णांना तासन्तास उपचारसाठी प्रतीक्षा करावी लागू नये यासाठी OPD व Emergency विभागातील मनुष्यबळ आणि डॉक्टरांची उपलब्धता वाढवावी, रूग्णांच्या तक्रारी तात्काळ सोडविण्यासाठी हॉस्पिटलमध्ये २४ तास कार्यरत तक्रार निवारण अधिकारी/हेल्प डेस्क उपलब्ध करून द्यावा, ईएसआयसी अंतर्गत कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना उपलब्ध असलेल्या उपचार व योजनांची माहिती स्पष्टपणे दर्शविणारे माहिती फलक हॉस्पिटलमध्ये लावण्यात यावेत, कामगार हितरक्षक संघ महाराष्ट्र राज्य ही कामगारांच्या प्रश्नांसाठी कार्यरत अधिकृत युनियन असून, संघटनेच्या प्रतिनिधींनी रूग्णांच्या अडचणीबाबत प्रशासनाशी संपर्क साधल्यास त्यांना योग्य सहकार्य व भेटीची अधिकृत व्यवस्था करण्यात यावी, संघटनेमार्फत प्राप्त होणाऱ्या रूग्णांच्या तक्रारींवर प्रशासनाने ठराविक कालमर्यादेत कार्यवाही करून त्याची माहिती संघटनेला द्यावी, ईएसआयसी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असलेल्या सर्व वैद्यकीय सुविधांचा पूर्ण क्षमतेने वापर करून रूग्णांना उपचार करा किंवा योग्य ठिकाणी तात्काळ पाठवा या तत्वानुसार सेवा देण्यात यावी, वरील सर्व मागण्यांवर ईएसआयसी प्रशासनाने संघटनेच्या प्रतिनिधींसोबत लेखी बैठक घेऊन ठोस निर्णय व कालबद्ध कार्यवाही जाहीर करावी. या प्रमुख मागण्या केल्या आहेत.

वरील मागण्यांकडे वारंवार दुर्लक्ष होत असल्याने कामगार व रूग्णांच्या न्याय्य हक्कांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. सदर आंदोलन पूर्णपणे, संविधानिक व लोकशाही मार्गाने करण्यात येईल. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक त्या दिलेल्या सूचनाचे पालन करण्यात येईल. त्यामुळे ईएसआयसी हॉस्पिटल, बिबवेवाडी मुख्य प्रवेशव्दारासमोर सदर आंदोलन करण्यात येणार आहे. असे कामगार हितरक्षक संघ महाराष्ट्र राज्य पुणे, संस्थापक अध्यक्ष-श्री.शरद भाकरे म्हणाले आहेत.

# योगाला शिक्षण, रोजगार आणि राष्ट्र उभारणीशी जोडावे : राज्यपाल

## कैवल्यधाम योग संस्थेत स्वामी कुवलयानंद यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाला राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची उपस्थिती

**पुणे :** भारताच्या युवा शक्तीला योग्य दिशा देण्यासाठी योगाला शाळा-महाविद्यालयांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनविणे आवश्यक आहे. प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयात पात्र योग शिक्षक अथवा प्रशिक्षकाचे स्वतंत्र पद निर्माण केले पाहिजे. यामुळे युवकांच्या आरोग्य व व्यक्तिमत्त्व विकासासोबतच प्रशिक्षित योग व्यावसायिकांसाठी रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

लोणावळा येथील कैवल्यधाम योग संस्थेत स्वामी कुवलयानंद यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, कैवल्यधामचे सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी सुबोध तिवारी, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, प्रबंधक परिषदेच्या सदस्या पुष्पा मांडके उपस्थित होते.



राज्यपाल म्हणाले, भारताकडे युवा शक्ती मोठ्या प्रमाणात असून त्याचा योग्य वापर केल्यास तो देशाचा सर्वात मोठा लोकसंख्याशास्त्रीय लाभांश ठरू शकतो. योगामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, शारीरिक तंदुरुस्ती, भावनिक संतुलन आणि आत्मजागरूकता वाढण्यास मदत होईल. त्यामुळे योग हा केवळ अधूनमधून केला जाणारा उपक्रम न राहता शिक्षणव्यवस्थेचा नियमित भाग झाला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

योगाच्या माध्यमातून जागतिक योग व वेलनेस अर्थव्यवस्था उभारण्याची भारताला मोठी संधी आहे. योग पर्यटन, प्रशिक्षण, संशोधन, डिजिटल व्यासपीठे, उपकरणे, वस्त्रे आणि विविध सेवांच्या माध्यमातून एमएसएमई, स्टार्टअप, महिला उद्योजक, कारागीर व स्थानिक समुदायांसाठी रोजगार आणि व्यवसायाच्या संधी निर्माण होऊ शकतात. योगाच्या माध्यमातून 'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत २०४७'च्या उद्दिष्टांना चालना देता येईल, असे राज्यपालांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले, कैवल्यधाम ही केवळ योग संस्था नसून भारताच्या प्राचीन ज्ञानपरंपरेला आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोड देणारी संस्था आहे. स्वामी कुवलयानंद यांनी १९२४ मध्ये कैवल्यधामची स्थापना करून योगाच्या वैज्ञानिक अभ्यास आणि संशोधनाची भक्कम पायाभरणी केली. त्यांनी सुरू केलेले 'योग मीमांसा' हे नियतकालिक आजही प्रकाशित होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. कैवल्यधामने राज्यातील विद्यापीठांशी शैक्षणिक भागीदारी करावी, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली.

योग अभ्यासक्रम तयार करणे, शिक्षकांना प्रशिक्षण व प्रमाणपत्र देणे, संशोधन करणे आणि विद्यार्थी जीवनात योगाचा समावेश करण्यासाठी कैवल्यधामने विद्यापीठांना सहकार्य करावे. तसेच भारतासह जगभरात आपली केंद्रे विस्तारावीत आणि देशातील इतर जुन्या योग संस्थांना सोबत घेऊन राष्ट्रीय पातळीवर कार्य करावे, असे आवाहनही राज्यपाल वर्मा यांनी केले.

यावेळी माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांनीही योगाच्या माध्यमातून शांततेचा संदेश जगभर पोहोचविण्याची गरज व्यक्त केली. स्वामी कुवलयानंदजींच्या पत्रांचे पुस्तक प्रकाशित झाल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. या पत्रांमधून तरुण विद्यार्थ्यांना जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आणि प्रगतीचा मार्ग समजण्यास मदत होईल, असे प्रभू यांनी सांगितले.

कैवल्यधामचे सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी सुबोध तिवारी यांनी प्रास्ताविक केले. कैवल्यधामच्या माध्यमातुन सुरू असलेल्या उपक्रमाबाबत त्यांनी माहिती दिली.

यावेळी विद्यार्थी, कैवल्यधाम परिवारातील सदस्य तसेच आयएनएस शिवाजीचे अधिकारी उपस्थित होते.

# लोकशाही म्हणजे बहुमताचे राज्य नव्हे, तर कायद्याचे राज्य : सुरेश द्वादशीवार

**पुणे :** संविधान म्हणजे केवळ सामान्य नागरिकांसाठी करण्यात आलेले नियम नसून सरकारला चौकटीत बांधून ठेवणारी व्यवस्था आहे. जनता आणि सरकार या दोघांचेही अधिकार व मर्यादा संविधानाने स्पष्ट केल्या आहेत. मात्र, नागरिकांना आपल्या घटनात्मक अधिकारांची पुरेशी जाणीव नसल्याने सरकारकडून मर्यादा ओलांडण्याची शक्यता निर्माण होते. लोकशाही म्हणजे बहुमताचे राज्य नव्हे, तर कायद्याचे राज्य होय. जनतेला जो न्याय लागू होतो, तोच सरकारलाही लागू झाला पाहिजे. मात्र, सरकारच्या मनमानी कारभारामुळे आज ही परिस्थिती दिसून येत नाही, अशी टीका ज्येष्ठ लेखक व पत्रकार सुरेश द्वादशीवार यांनी केली.

ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत आणि युवक क्रांती दलाचे संस्थापक डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या ८५व्या जयंतीनिमित्त गांधी भवन येथे शुक्रवारी 'संविधानासमोरील प्रश्न' या विषयावर द्वादशीवार यांचे जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत व माजी आमदार उल्हास पवार होते. या प्रसंगी विश्वंभर चौधरी, असीम सरोदे, अनंत बागाईतकर, रवींद्र पोखरकर, प्रवीण सपतर्षी, प्रमोद वागदरीकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विश्वस्त सचिव अन्वर राजन यांनी केले.

द्वादशीवार म्हणाले, डॉ. कुमार सप्तर्षी यांचे आपल्यात नसणे ही अत्यंत दुःखद बाब आहे. त्यांच्याशी माझा सुमारे ६० वर्षांचा संपर्क होता. आमच्यात वैचारिक मतभेद होते; मात्र मनभेद कधीच नव्हते. कुमार हा केवळ नेता नव्हता, तर खरा कार्यकर्ता होता. राज्यशास्त्राचा २६ वर्षे




प्राध्यापक म्हणून काम करताना संविधानातील अनेक शब्द आपण रोज वापरतो; मात्र त्यांचे खरे अर्थ कितीजणांना उमगले आहेत, हा प्रश्न आहे. समाजवाद म्हणजे गरिबांच्या बाजूने उभे राहणे. गांधीवादाचीही ठरावीक चौकट नाही. महात्मा गांधी परिस्थितीनुसार स्वतंत्रपणे विचार करून निर्णय घेत असत. त्याचप्रमाणे डॉ. सप्तर्षी कोणाचेही अनुयायी नव्हते. त्यांनी कोणत्याही विचारसरणीच्या चौकटीत अडकून न पडता स्वतंत्र संघटन उभे केले.

### प्रजासत्ताकातील सत्तेच्या केंद्रीकरणावर टीका

संविधानात भारताला प्रजासत्ताक म्हटले आहे. मात्र, सत्तेवर बसलेला व्यक्ती सम्राटासारखा वागत असेल आणि त्याच्या शब्दाला संसद व न्यायालयही मान्यता देत असेल, तर प्रजासत्ताक केवळ कवितेपुरते उरते, अशी टीका द्वादशीवार यांनी केली.

धर्मनिरपेक्षतेचा अर्थ स्पष्ट करताना ते म्हणाले, मानवी जीवनातील उच्च नैतिक मूल्यांचे रक्षण करणारी धारणा म्हणजे धर्मनिरपेक्षता. धर्माच्या नावावर इतिहासात मोठ्या प्रमाणावर संघर्ष आणि हिंसा झाली आहे. त्यामुळे धर्म, जात आणि पंथाच्या पलीकडे जाऊन मानवतेचा विचार करणे आवश्यक आहे.

देशातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक न्यायाचा अर्थ नागरिकांनी समजून घेतला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या कर्तृत्वानुसार संधी मिळणे म्हणजे न्याय होय. लोकप्रतिनिधी आपण निवडतो, त्यामुळे त्यांच्या कामाचा जाब विचारण्याचा अधिकार नागरिकांना आहे. धर्म, विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असेल, तर लोकशाहीसमोर गंभीर प्रश्न निर्माण होतात, असेही त्यांनी सांगितले.

देशातील मोठ्या लोकसंख्येचे जीवन आजही सरकारी अन्नधान्यावर अवलंबून आहे. मात्र, या परिस्थितीबाबत सरकारला जाब विचारण्यासाठी नागरिक संघटितपणे पुढे येत नाहीत. समाज जात-धर्माच्या आधारावर विभागला जात आहे. शिक्षणाचे बाजारीकरण झाले असून सरकारी शाळांची संख्या कमी होत असताना खासगी शिक्षणाचा विस्तार होत आहे. मतदार याद्यांच्या पुनरिक्षणाच्या प्रक्रियेत विशिष्ट समाजघटकांच्या नावांबाबत प्रश्न उपस्थित होत असतील, तर समानतेच्या घटनात्मक तत्त्वाबाबतही चिंता निर्माण होते, असे द्वादशीवार यांनी नमूद केले.

### 'अधिकार समजले तर सरकार वठणीवर येईल'

संविधानाची उद्देशिका ही घटनेचा पाया आहे. नागरिकांना आपले घटनात्मक अधिकार समजले, तर सरकारला जाब विचारता येईल आणि सरकारला वठणीवर आणता येईल. देशाने संविधानाच्या मूळ चौकटीकडे पुन्हा गांभीर्याने पाहण्याची गरज आहे, असे आवाहन द्वादशीवार यांनी केले.

उल्हास पवार म्हणाले, सर्वसामान्यांच्या अपेक्षांचे सरकारच्या माध्यमातून परिवर्तन होणे, हे लोकशाहीचे प्रमुख लक्षण आहे. मानवता, समता आणि नैतिकता या मूल्यांचा आदर्श महात्मा गांधी यांच्या विचारांतून शिकता येतो. गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार एकत्रितपणे समाजापर्यंत पोहोचविण्याची आज गरज आहे. जात-धर्माच्या पलीकडे जाऊन मानवता हीच जात आणि भारतीयत्व हाच धर्म मानला पाहिजे.

अन्वर राजन म्हणाले, व्यक्ती नसली तरी संस्था आणि तिचे उपक्रम थांबता कामा नयेत, ही डॉ. सप्तर्षी यांची भूमिका होती. त्यानुसार त्यांच्या जन्मदिनानिमित्त हे व्याख्यान आयोजित करण्यात आले. संविधानाच्या मूलभूत मूल्यांशी सोयीस्करपणे खेळ केला जात असल्याची भावना निर्माण होत आहे. न्यायव्यवस्थेची भूमिकाही चिंताजनक आहे. मात्र, यापुढे सर्व संस्थांनी अधिक जबाबदारीने वागण्याची गरज आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज कुलकर्णी यांनी केले, तर तेजस भालेराव यांनी आभार प्रदर्शन केले.

# समाविष्ट गावांतील करवाढीवरून गटनेते काकासाहेब चव्हाण...

**(पान १ वरून)** गठित करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, या आश्वासनाला तब्बल पाच महिने उलटूनही एकही बैठक झालेली नाही किंवा प्रश्न सोडविण्याच्या दिशेने कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे दिलेली आश्वासने केवळ वेळकाढूपणासाठी होती का, असा सवालही चव्हाण यांनी केला. याचबरोबर, सभागृह नेत्यांनी पहिल्याच मुख्य सभेत शहराच्या विकासासाठी नागरिकांवर अतिरिक्त कराचा बोजा न टाकता महापालिकेच्या उत्पन्नाचे पर्यायी स्रोत बळकट करण्यावर भर देण्याचे स्पष्ट केले होते. समाविष्ट गावांच्या करवाढीचा प्रश्न आगामी अर्थसंकल्पापूर्वी विशेष सभा घेऊन मार्गी लावण्याचे आश्वासनही देण्यात आले होते. मात्र, अर्थसंकल्प सादर होऊनही अद्याप विशेष सभा घेण्यात आलेली नाही.

समाविष्ट गावांतील नागरिकांवर अन्यायकारक करवाढीचा भार टाकण्यापूर्वी त्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे आणि उपलब्ध नागरी सुविधांकडे महापालिकेने गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. कर आकारणीच्या बाबतीत शहरातील इतर भागांप्रमाणे सुविधा आणि सेवा देण्याची जबाबदारीही महापालिकेची आहे, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

प्रशासनाच्या या चालढकल कारभाराचा निषेध करत, समाविष्ट गावांच्या करप्रश्नावर येत्या एका महिन्याच्या आत विशेष सभा घेऊन निर्णय घ्यावा, अशी ठाम मागणी काकासाहेब चव्हाण यांनी केली. नागरिकांवर अन्यायकारक करवाढ लादण्याचा प्रयत्न झाल्यास सर्व विरोधी पक्षांना सोबत घेऊन महापालिकेत आणि सभागृहाबाहेरही संघर्ष अधिक तीव्र केला जाईल, असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला.

यावेळी विरोधी पक्ष नेते निलेश निकम, गटनेते चंदू कदम, गटनेते नितीन गावडे, अनिता इंगळे यांच्यासह सर्व विरोधी पक्षातील सर्व नगरसेवक उपस्थित होते.